# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लिमिटेड

CIN : U15424PN1999PLC013976
नोंदणीकृत कार्यालय : स.नं. १२/२, दुसरा मजला, मेघदुत बिल्डींग, भारत पेट्रोल पंपाच्यामागे, जुना लोखंडी पुल रस्ता, हडपसर, पुणे ४११०२८
मो. ८५५१८६८८९९. ई-मेल : sharesmskl@gmail.com,
web : www.shreenathsugar.com

## २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची आणि ई-व्होटिंगची सूचना

### वार्षिक सर्वसाधारण सभा :-

अशी सूचना देण्यात येते की, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. (कंपनी) च्या सभासदांची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (VC) / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमाद्वारे (OAVM) कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या सामान्य परिपत्रकानुसार, सर्वसाधारण सभेच्या नोटीस मध्ये नमुद केलेल्या कामकाजासाठी घेण्यात येणार आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व कंपनीचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक अहवाल सभासदांना ज्यांचे ई-मेल आयडी कंपनीकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठविले जातील. तसेच कंपनीचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व २६ व्या एजीएम ची सूचना कंपनीच्या www.shreenathsugar.com या वेबसाईटवर उपलब्ध असेल.

**रिमोट ई-व्होटिंग :-**

कंपनी सभासदांना एजीएम मध्ये मतदान करण्यासाठी एजीएम पूर्वी रिमोट ई-मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करुन देत आहे. ई-मतदाना बाबतचा तपशील खालीलप्रमाणे :

अ) रिमोट ई-मतदान मंगळवार दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरु होईल अणि गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता संपेल. या कालावधीत, सभासद त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पध्दतीने देऊ शकतात. त्यानंतर रिमोट ई-मतदान मॉड्युल मतदानासाठी CDSL द्वारे बंद केले जाईल.

ब) ई-व्होटिंगद्वारे मत देण्यासाठी लॉगिन क्रेडेन्शियल सभासदांना ई-मेलद्वारे उपलब्ध करुन दिले जातील. ज्या सभासदांना ई-मेल मिळाले नाहीत किंवा ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत नाहीत, ते एजीएमच्या नोटिसमध्ये दिलेल्या सुचनांचे पालन करुन लॉगिन क्रेडेन्शियल तयार करु शकतात. कंपनीच्या www.shreenathsugar.com या वेबसाईटवर ई-मतदाना बाबतचा तपशिल उपलब्ध असेल.

जे सभासद मिटिंगला उपस्थित आहेत परंतु त्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिले नाही, अशा सभासदांना कंपनी सभेनंतर मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देईल. ज्या सभासदांनी सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे आपले मत दिले आहे, ते देखील सभेला उपस्थित राहू शकतात, परंतु त्यांना पुन्हा मतदान करण्याचा अधिकार असणार नाही.

रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान करण्यासाठी आणि एजीएम मध्ये मतदान करण्यासाठी सदस्यांची पात्रता निश्चित करण्याची अंतिम तारीख २० सप्टेंबर २०२५ आहे.

**ई-मेल पत्त्यांची नोंदणी :-**

ज्या सभासदांनी फिजिकल मोडमध्ये शेअर्स धारण केले आहेत आणि ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनीकडे नोंदणी केलेले नाहीत, त्या सभासदांना त्यांचे ईमेल पत्ते कंपनीच्या sharesmskl@gmail.com या ईमेल आयडीवर नोंदणी करण्याची विनंती केली जात आहे. सदस्यांनी त्यांचे ईमेल आयडी, नाव, पत्ता, फोलिओ क्रमांक, पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत आणि पत्याचा पुरावा म्हणून कोणत्याही दस्तऐवजाची (जसे की आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा निवडणुक ओळखपत्र इ.) स्व-प्रमाणित स्कॅन केलेली प्रत पाठवावी. डिमटेरिअलाइज्ड मोडमध्ये शेअर्स धारण केलेल्या सदस्यांना त्यांचे ईमेल पत्ते संबंधित डिपॉझिटरी कडे नोंदणी/अपडेट करण्याची विनंती केली जात आहे.

रिमोट ई-मतदान व एजीएम मधील ई-मतदाना बाबतची आणि व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएम मध्ये उपस्थित राहण्याची तपशीलवार सूचना एजीएमच्या नोटिस मध्ये नमूद केलेली आहे.

सभासदांना ई-व्होटिंगबाबत काही शंका किंवा समस्या असल्यास, सभासद कंपनीला sharesmskl@gmail.com वर लिहू शकतात किंवा ८२६१०५८७७१ वर संपर्क करु शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहू शकतात किंवा 1800 210 9911 वर संपर्क करु शकतात.

ठिकाण : पुणे
दिनांक : ०४ सप्टेंबर २०२५

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
प्रतिक नायकवडी (कंपनी सचिव)